दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

www.raigadnagari.com
/ raigadnagari



दैनिक रायगड नगरी

जाहिरातीचे उत्तम माध्यम

या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.

Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'

For Booking....

Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706

Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434

Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com



वर्ष २० वे | अंक २६८ | MAHMAR/2006/17212 | रायगड | शुक्रवार, दि.२६ डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित


## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील पहिल्या उड्डाणाचे साक्षीदार होण्यासाठी प्रवाशांची मोठ्या प्रमाणात रेलचेल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून पहिल्या व्यावसायिक उड्डाणाचा ऐतिहासिक क्षण अनुभवण्यासाठी प्रवाशांमध्ये प्रचंड उत्साह गुरूवारी पहाटे पाहायला मिळाला. नोव्हेंबरपासूनच अनेकांनी पहिल्या प्रवासासाठी तिकीट आरक्षण करून हा दिवस डोळ्यांत साठवून ठेवला होता. पहाटे साडेसहा वाजल्यापासूनच विमानतळाच्या प्रवेशद्वारांवर गर्दी वाढू लागली. विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य, विकसक, प्रकल्पग्रस्त कुटुंबे आणि नवी मुंबईतील विविध क्षेत्रांतील नागरिक कुटुंबीयांसह या सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी उपस्थित होते.



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची संकल्पना मांडली गेल्यापासून प्रत्यक्ष उड्डाणापर्यंतचा सुमारे २५ वर्षांचा प्रवास आज पूर्णत्वास गेला, याचे समाधान अनेकांच्या चेहर्यावर स्पष्ट दिसत होते. खास प्रकल्पग्रस्तांना यासाठी आमंत्रित करण्यात आले. त्यांच्या जमीन त्यागावर हे विमानतळ उभे राहील्याची भावना यावेळी त्यांच्या चेह-यावर स्पष्ट दिसत होती. या पार्श्वभूमीवर जासई गावातील प्रकल्पग्रस्तांनी विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी करत काही क्षणासाठी येथे घोषणाबाजी सुद्धा केली.

कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून सहाय्यक पोलीस आयुक्त मयूर भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्त तैनात करण्यात आला. समजूत काढल्यानंतर प्रकल्पग्रस्तांपैकी प्रवाशांना विमानतळ परिसरात प्रवेश देण्यात आला.दरम्यान, अदानी उद्योग समूहाचे प्रमुख गौतम अदानी यांनी सकाळी विमानतळाला भेट दिली. सकाळी आठ वाजता बंगळुरूहून आलेले ६ ई ४६० विमान धावपट्टीवर उतरले असता जलतोफांच्या सलामीने त्याचे स्वागत करण्यात आले. हा क्षण अत्यंत भावूक आणि आनंददायी असल्याची प्रतिक्रिया प्रवाशांनी व्यक्त केली. त्यानंतर सकाळी ८.४० वाजता ६ ई ८८२ हे विमान हैदराबादसाठी रवाना झाले. पहिल्या प्रवासाचा अनुभव घेण्यासाठी अनेकांनी परतीची तिकिटेही काढली होती.

विशेष म्हणजे अदानी फाऊंडेशन तर्फे प्रकल्पग्रस्त कुटुंबे, खास बालके आणि स्वयंरोजगारासाठी कौशल्य प्रशिक्षण घेतलेल्या अशा ७० जणांसाठी विशेष उड्डाणाची व्यवस्था करण्यात आली. ४५ मिनिटांच्या हवाई फेरीतून पुन्हा धावपट्टीवर उतरणार्या या विमानामुळे अनेकांना पहिल्यांदाच आकाशात झेप घेण्याचा अनुभव मिळणार आहे. कधीच विमानप्रवास न केलेल्यांना हा अनुभव देण्यासाठी हे नियोजन केल्याची माहिती फाउंडेशनच्या सुवर्णा शेटे यांनी दिली.

## केळघर रस्त्याची दुरवस्था : दुतर्फा झाडी झुडपे

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

रस्त्याच्या दुतर्फा झाडी झुडपे वाढलेल्या फांद्या यामुळे मुरुड तालुक्यातील दुर्गम भागातील केळघर एस.टी.सेवा दहा बारा दिवसांपासून बंद झाल्याने शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व प्रवासी वर्गाला त्रास सहन करावा लागत असून संबंधित बांधकाम खात्याच्या दुर्लक्षाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

मुरुड केळघर मार्गे रोहा रस्त्यावर मुरुड पासून अंदाजे पंधरा कि.मी.अंतरावर असलेल्या केळघर रस्त्यावर दुतर्फा झाडी झुडपे आणि वाढलेल्या झाडांच्या फांद्या एस.टी. व अवजड वाहनांची डोकेदुखी ठरत असून फांद्या लागून काही गाड्यांच्या काचा फुटल्या असल्याचे बोलले जात आहे.त्यामुळे या मार्गावर एस.टी. सेवा बंद झाल्याने शालेय विद्यार्थी ज्येष्ठ नागरिक व प्रवासी वर्गाला त्रास सहन करावा लागतो आहे. शासनाच्या संबंधित बांधकाम खात्याने यात तातडीने लक्ष पुरवून योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी केली जात आहे.



## इक्बाल काझी प्रभाग क्र. १४ मधून भाजपमहायुतीचा कमळ फुलविणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्र. १४ मधून उद्योजक तथा समाजसेवक ईकबाल काझी निवडणूक लढविण्याची दाट शक्यता असून, त्यांना भारतीय जनता पार्टी व महायुतीकडून उमेदवारी मिळण्याबाबत सकारात्मक संकेत मिळत आहेत.

एक सर्वसामान्य कार्यकर्ता ते यशस्वी उद्योजक,व समाजसेवक असा प्रवास केलेल्या ईकबाल काझी यांच्या नावाची चर्चा १४ क्रमांक प्रभागातील उमेदवारीसाठी जोर धरताना दिसत आहे. सामाजिक, शैक्षणिक व व्यवसाय क्षेत्रात त्यांनी केलेल्या कार्यामुळे त्यांना जनतेचा मोठा पाठिंबा मिळत असल्याचे चित्र आहे.

भाजप-महायुतीकडून अधिकृत उमेदवारी मिळाल्यास प्रभाग क्र. १४ मध्ये पक्षाला मोठे मताधिक्य मिळण्याची शक्यता असल्याचे मत प्रभाग १४ मधील जनतेच्या वतीने व्यक्त केले जात



आहे त्यांच्या संभाव्य उमेदवारीमुळे परिसरातील नागरिकांमध्ये उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, सोशल मीडियावरही याबाबत खात्रीशीर माहिती प्रसारित होताना दिसत आहे.

ईकबाल काझी यांची उमेदवारी ही सर्वसामान्य जनतेचा विश्वास जिंकणारी ठरेल, असा विश्वास स्थानिक कार्यकर्ते व नागरिक व्यक्त करत आहेत.

गोरगरीबांना नेहमी सढळ हाताने मददतगार म्हणुन त्यांची ख्याती आहे आपल्या कष्टाने व ईश्वराच्या कृपेने आपल्याला जे काही मिळते त्यातील काही हीस्सा हा सर्व जातीधर्माच्या समाजाकरीताच असतो तो आपण सढळ हाताने एक समाजसेवक या नात्याने करावयाचा असतो हीच भावना ईकबाल काझी यांनी तळागळात रूजविल्याने यापूढेही जाऊन या पेक्षा चांगली सेवा करण्याचे त्यांचे स्वप्न प्रभाग क्र.१४ मधील सर्व सामान्य नागरीक साकार करतील यात तिळमात्र शंका नाही असे नागरीकांत बोलले जात आहे.

## महायुतीच्या गटनेते पदी शिवाजी शिंदे यांची निवड

**दै.रायगड नगरी । माथेरान**

नुकताच पार पडलेल्या नगरपरिषदेच्या निवडणुकीत शिवसेना भाजप युतीने घवघवीत यश मिळविले आहे. वीस पैकी पंधरा जागांवर आणि थेट नगराध्यक्ष पदावर सुध्दा महायुतीचे उमेदवार चंद्रकांत चौधरी यांनी मोठया मताधिकक्याने विजय मिळवला आहे.



प्रभाग क्र. तीन मधून विजयी होऊन नगरपरिषदेच्या सभागृहात जाण्यासाठी विजयी हट्रिक करणारे अनुभवी, कार्यकुशल,अभ्यासू आणि निर्भीड व्यक्तिमत्त्व असणारे शिवाजी शांताराम शिंदे यांची महायुतीच्या गटनेते पदावर निवड करण्यात आली आहे. त्यामुळे शिवाजी शिंदे यांच्या रूपाने नक्कीच पक्षाला उभारी मिळणार असून आगामी काळात महत्वाकांक्षी कामे, गावाच्या विकासाच्या दृष्टीने सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न होणार असून शिवाजी शिंदें सारख्या योग्य व्यक्तीची निवड केल्यामुळे समस्त महायुतीच्या कार्यकर्त्यांमधून समाधान व्यक्त केले जात आहे. समाज माध्यमांवर शिवाजी शिंदे यांना भरभरून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## कामोठ्यात मारहाण करणाऱ्या शिक्षिकांविरोधात गुन्हा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील कामोठे परिसरातील एका नामांकित शाळेत सहा वर्षांच्या चिमुकल्यावर शिक्षकांकडून मारहाण झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, या प्रकरणी दोन महिला शिक्षिकांविरोधात बाल न्याय अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे पालकवर्गात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणार्या सेक्टर २४ येथील एका शाळेत सहा वर्षीय विद्यार्थ्याला दोनवेळा दोन वेगवेगळ्या शिक्षिकांकडून मारहाणीचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

या प्रकरणी बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ अंतर्गत कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोन महिला शिक्षिकांची नावे संशयीत आरोपी म्हणून नमूद करण्यात आली आहेत. पिडीत पालकांनी दिलेल्या तक्रारीनूसार १४ आणि २८ नोव्हेंबरला मारहाणीची घटना शाळेत घडली.

शाळकरी मुलांच्या आपसातमधील भांडणावरून याची सुरूवात झाली. संशयीत आरोपी वर्गशिक्षिकेने १४ नोव्हेंबरला दुपारी १ ते २ या वेळेत दुसर्या वर्गातील एका विद्यार्थिनीला बोलावून पिडीत मुलाच्या गालावर पाच ते सहा वेळा मारण्यास सांगितले.

ही घटना घडत असताना संबंधित शिक्षिका हसत असल्याचा आरोप तक्रारीत पालकांनी केला. त्यानंतर दूसरी घटना २८ नोव्हेंबरला सकाळी ११ ते ११.३० या वेळेत इंग्रजी विषयाच्या शिक्षिकाच्या हाती घडली. या शिक्षिकेने विद्यार्थ्याच्या तोंडावर कंपास बॉक्सने मारहाण केली. या मारहाणीत मुलाचा ओठ सुजल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. दोन्ही घटनांमुळे मुलाला शारीरिक तसेच मानसिक त्रास सहन करावा लागल्याचा आरोप पालकांनी केला आहे.

फिर्यादींनी याबाबत यापूर्वी शाळा व्यवस्थापनाकडे दाद मागीतली. मात्र शाळा व्यवस्थापनाच्या प्रतिसादावर समाधान झाल्याने पालकांनी पोलीस ठाण्यात अर्ज केला होता. या तक्रारी अर्जाची पोलिसांनी प्राथमिक चौकशीनंतर आणि शाळा व्यवस्थापनाचे जबाब नोंदविल्यानंतर गुन्हा नोंद केला. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अरविंद मसलकर हे करीत आहेत.

नोव्हेंबर महिन्यात अशाच प्रकारची मारहाण एका विद्यार्थीनीला खारघर येथील जिल्हापरिषदेच्या शाळेत झाल्याने विद्यार्थ्यांच्या सूरक्षेविषयी चिंता व्यक्त केली जात असताना ही दूसरी घटना कामोठे येथे घडली. या दोन्ही घटनांमुळे शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणी पालकवर्गाकडून करण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून मारहाण करणे या गुन्ह्याला सात वर्षांपेक्षा अधिक काळ शिक्षा होत नसल्याने या प्रकरणी तपास अधिकारी मसलकर यांनी संबंधित शिक्षकांना या प्रकरणी नोटीस बजावली.

## पनवेलमध्ये भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**



भारताचे माजी पंतप्रधान, थोर राजनेते, कुशल वक्ते व कवीहृदय व्यक्तिमत्त्व भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते श्रीनंद पटवर्धन, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, दीपक बेहेरे, कर्जतचे माजी तालुकाध्यक्ष मंगेश म्हसकर, माथेरान नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, शहर अध्यक्ष प्रवीण सकपाळ, नेरल मंडल अध्यक्ष नरेश मसणे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, पनवेल नगरपरिषदेचे माजी नगर-सेवक प्रभाकर बहिरा, कामगारनेते रविंद्र नाईक, यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून आदरांजली वाहिली.

आदरांजली वाहताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीत राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य देत भारतीय लोकशाही अधिक बळकट केली. संवाद व सहमतीचा मार्ग त्यांनी नेहमी स्वीकारला. पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात सुवर्ण चतुर्भुज महामार्ग योजना, पोखरण अणुचाचणी, ग्रामसडक योजना तसेच परराष्ट्र धोरणातील धाडसी व दूरदृष्टीपूर्ण निर्णय आजही स्मरणात राहणारे आहेत. राजकारण हे सत्तेसाठी नव्हे तर सेवेसाठी असते, हा संदेश त्यांनी आपल्या आच-ारातून दिला. कवी म्हणून त्यांनी लिहिलेल्या कविता समाजाला संवेदनशीलता व राष्ट्रप्रेमाचा संदेश देणाऱ्या ठरल्या. अटलजींच्या विचारांना पुढे नेण्याचा संकल्प आणि त्यांच्या आदर्शांवर चालणे हीच खरी त्यांना श्रद्धांजली असल्याचे त्यांनी आपल्या मनोगतात अधोरेखित केले.

## महापालिकेच्या रणधुमाळीत तहसील कार्यालयात सर्व्हर डाऊन असल्यामुळे उमेदवारांचा खोळंबा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असताना निवडणुकीच्या रिंगणात उत्तरु इच्छिणार्या इच्छुक उमेदवारांना प्रतिज्ञापत्र तयार करून घेताना पनवेल तहसील कार्यालयात अडथळे येत आहेत. काही दिवसांपासून सव्हर डाऊन असल्यामुळे त्यांच प्रतिज्ञापत्र तयार होऊ शकलेले नाही. त्यामुळे निवडणूक लढवू इच्छिणार्या उमेदवारांची, तसेच विविध कामे घेऊन येणार्या नागरिकांचीही गैरसोय होत आहे.

पनवेल तहसील कार्यालयात सर्वार डाऊन असण्याची समस्या अनेकदा जाणवत असते. त्यामुळे नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागतो. सध्या निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यासाठी उमेदवारांना आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करणे गरजेचे आहे. आतापर्यंत जवळपास ५०० निवडणूक अर्जाची विक्री झाली आहे.

परंतु अद्यापही एकाही उमेदवाराने अर्ज भरलेला नाही, तरी उमेदवारांकडून अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची जुळव-ाजुळव करण्यासाठी धावपळ सुरू झाली आहे. अर्ज भरताना विविध कारणांसाठी उमेदवारांना प्रतिज्ञापत्र देणे गरजेचे असते. महसूल विभागाच्या माध्यमातून पनवेल पालिका क्षेत्रातील उमेदवारांसाठी पनवेल तहसील कार्यालयातून प्रतिज्ञापत्र यावे लागते. इच्छुक उमेदवारांसह इतर कामे घेऊन येणाऱ्या नागरिकांची सेतू कार्यालयात गर्दी होत आहे. परंतु ऑनलाइन प्रतिज्ञापत्र तयार करण्यात येणार्या वेबसाइटचा सर डाऊन असल्यामुळे अनेक उमेदवार, उमेदवारांचे प्रतिनिधी यांना ताटकळत थांबावे लागते आहे. त्यामुळे प्रतिज्ञापत्र मिळू न शकल्यामुळे उमेदवारांनी नाराजी व्यक्त केली आहे. उमेदवारांचा आणि नागरिकांचा खोळंबा होत आहे.

# निवडणूक कामात शिक्षकच का?

'एक देश एक निवडणूक' या संकल्पनेचा कितीही गाजावाजा झाला तरी देशाच्या कानाकोपऱ्यात कोणत्या ना कोणत्या निवडणुका सतत होतच असतात. अगदी ग्रामपंचायतींपासून ते लोकसभेपर्यंत हा निवडणुकांचा धडाका राजकीय पक्षांचे नेते व कार्यकर्त्यांना सतत गुंतवून ठेवतो. त्यामुळे आदर्श कल्पना म्हणून देशभरात एकाचवेळी सगळ्या निवडणुका घेण्याच्या कितीही घोषणा झाल्या तरी हा सुविचार कधी प्रत्यक्षात अनुभवता येईल, अशी काही चिन्हे नाहीत. किंबहुना त्या घोषणा करणाऱ्यांना तरी खरेच मनातून तशी इच्छा आहे की नाही ही शंका यावी, अशी एकंदर परिस्थिती आहे. मागील वर्षी सहा महिन्यांच्या अंतराने लोकसभा व विधानसभा निवडणूक पार पडली. त्यानंतर काही ग्रामपंचायतींची निवडणूक झाली आणि आता गेली नऊ-दहा वर्षे रखडलेल्या नगरपालिका-नगरपंचायती, महापालिका व जिल्हा परिषद, पंचायत समित्या अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. यातल्या नगरपालिका-नगरपंचायतींच्या निवडणुकांचा धुरळा खाली बसण्याआधी महापालिका निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. नव्या वर्षाच्या पहिल्या महिन्याच्या मध्यात या निवडणुकीचे निकाल लागेपर्यंत पंचायत समित्या व जिल्हा परिषद निवडणुकीचा रणसंग्राम सुरू झालेला असेल. कारण, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ३१ जानेवारीच्या आत या सगळ्या निवडणुका राज्य निवडणूक आयोगाला आटोपायच्या आहेत. असो. हा सगळा गदारोळ आता विचारात घेण्याचे कारण म्हणजे निवडणुकांचे हे अवजड व अवघड धनुष्य पेलणारी प्रशासकीय यंत्रणा. एकतर केंद्रीय तसेच राज्य निवडणूक आयोगाकडे स्वत:चे कोणतेही मनुष्यबळ नाही. मतदारयाद्या तयार करण्यापासून ते त्या वेळोवेळी अद्ययावत करण्यापर्यंत, अगदी त्यातील दुरुस्तीसाठीचीही सगळी कामे महसूल यंत्रणेला करावी लागतात. ती यंत्रणा कमी पडली की जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जिल्ह्या-जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी जिल्हा परिषद व इतर यंत्रणांमधून हवे ते व हवे तेवढे कर्मचारी अधिग्रहित करतात. प्रत्यक्ष निवडणूक पार पाडणे हे अत्यंत जोखमीचे घटनादत्त काम असल्यामुळे त्यासाठी प्रामुख्याने शिक्षकांवर जबाबदारी टाकली जाते. शासकीय व गैरशासकीय शाळांची संख्या मोठी, त्यातील शिक्षकांचीही संख्या मोठी आणि निवडणूक पार पाडण्यासाठी लागणाऱ्या सुशिक्षित मनुष्यबळाची गरजही मोठी, यामुळे गरज किंवा मागणी व पुरवठा ही दोन्ही सूत्रे लक्षात घेऊन सगळ्या निवडणुकांचे ओझे शिक्षकांच्या खांद्यावर येऊन पडते. त्याबद्दल नाराजी व्यक्त करण्याची किंवा ते काम नाकारण्याची सोय नसते. कारण, निवडणूक आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करताना निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना जास्तीचे अधिकार प्राप्त झालेले असतात. जनगणनेसह वेगवेगळ्या प्रकारची मोजणी, शिरगणती किंवा या निवडणुका अशा नानाविध गैरशैक्षणिक कामांचा बोजा शिक्षकांना असह्य झाल्याच्या आणि परिणामी शैक्षणिक कामांकडे दुर्लक्ष होत असल्याच्या कितीही तक्रारी झाल्या तरी त्याकडे ना शासन लक्ष देत, ना समाज त्यांची दखल घेतो. मतदानावर परिणाम होऊ नये म्हणून आपण उन्हाळ्यात निवडणुका टाळतो. परिणामी त्या शैक्षणिक सत्र सुरू असतानाच घ्याव्या लागतात. यंदा तर ऐन शैक्षणिक सत्राच्या अखेरीस ही सगळी कामे शिक्षकांच्या वाट्याला आली आहेत. फेब्रुवारीत होणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांच्या आयुष्याला वळण देणाऱ्या या टप्प्यावर अभ्यासक्रम पूर्ण करायचे आहेत. परीक्षेच्या दृष्टीने त्यांची पुरेशी उजळणी करून घ्यायची आहे. मार्च महिन्यातील इतर परीक्षांची तयारी विद्यार्थ्यांकडून करून घ्यायची आहे आणि अशावेळी ही निवडणुकीची कामे पुढ्यात येऊन पडली आहेत. दर पाच वर्षांनी येणाऱ्या निवडणुका आणि विद्यार्थ्यांच्या आयुष्यात एकदाच येणारी दहावी किंवा बारावीची परीक्षा यातील प्राधान्याबद्दल शिक्षकांना निर्णय घ्यायचा आहे. खरेतर अशावेळी राज्य सरकारने, विशेषत: प्रशासनाने अन्य पर्याय शोधायला हवेत. ज्यांचा विद्यार्थ्यांसारख्या घटकांच्या भवितव्याशी तसा संबंध नाही, अशा शासनाच्या इतर विभागातील कर्मचारी-अधिकारी निवडणुकीच्या कामासाठी वापरणे, निवडणूक किंवा अशा तत्सम कामांसाठी एक अस्थायी फळी तयार करून ठेवणे यांसारख्या पर्यायांचा विचार करायला हवा. याशिवाय आणखी काही पर्याय आहेत का यावर खुली चर्चा व्हावी. या क्षेत्रातील तज्ज्ञांनी उपाय सुचवावेत आणि प्रशासनाने संवेदनशीलपणे त्यावर विचार करावा. जेणेकरून शैक्षणिक चाकोरीबाहेरच्या कामांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही.

# पोस्को कंपनीच्या 'बेटी बचाओ बेटी पढाओ' अभियानातून १०० मुली लाभान्वित




**दै.रायगड नगरी । माणगाव**

औद्योगिक क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने आपल्या सामाजिक उत्तरदायित्व सी.एस.आर निधीतून ग्रामीण भागातील मुलींच्या उज्वल भविष्यासाठी एक आश्वासक पाऊल उचलले आहे. केंद्र सरकारच्या 'बेटी बचाओ बेटी पढाओ' या योजनेला बळ देत कंपनीने भागाड ग्रामपंचायत हद्दीतील प्रत्येक पात्र बालिकेच्या नावे ५०,००० रुपयांची मुदत ठेव करण्याचा उपक्रम यशस्वीपणे राबवला आहे. सन २०१७ पासून सुरु असलेल्या या उपक्रमाद्वारे आत्तापर्यंत १०० मुलींना या योजनेचा लाभ मिळाला आहे.

या योजनेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, ही ५०,००० रुपयांची ठेव मुलगी १८ वर्षांची होईपर्यंत सुरक्षित राहते व १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर व्याजासह मिळणारी ती रक्कम मुलीला तिचे उच्च शिक्षण किंवा व्यावसायिक प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी उपयोगात येते. आर्थिक टंचाईळे ग्रामीण भागातील मुलींचे शिक्षण अपूर्ण राहू नये हा या मागचा मुख्य उद्देश आहे.

दि. १६ डिसेंबर २०२५ रोजी भागाड ग्रामपंचायत कार्यालयात पार पडलेल्या या कार्यक्रमात २०२४ मध्ये जन्मलेल्या ५ मुलींना मान्यवरांच्या हस्ते मुदत ठेव प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी माणगावच्या गटविकास अधिकारी सौ. शुभदा पाटील यांनी कंपनीच्या विविध उपक्रमाचे कौतुक केले. त्या म्हणाल्या, पोस्को कंपनीने केवळ उद्योग उभारला नाही तर इथल्या समाजाशी नाते जोडून मुलींच्या जन्माचे स्वागत करण्याची संस्कृती रुजवली आहे. अश्या उपक्रमांमुळेच ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होत आहे.

कार्यक्रमावेळी पोस्को महाराष्ट्र स्टीलचे वरिष्ठ अधिकारी श्री. जी युन पार्क यांनी कंपनीची भूमिका स्पष्ट केली. त्यांनी सांगितले मुलींचे सक्षमीकरण हा केवळ एका कुटुंबाचा नव्हे तर संपूर्ण राष्ट्राच्या विकासाचा पाया आहे. हा उपक्रम खरोखरच खास आहे, कारण तो भारत सरकारच्या बेटी बचाओ, बेटी पढाओ योजनेशी सुसंगत आहे, जो लिंग समानता आणि मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देतो. आम्ही स्थानिक समुदायांना त्यांच्या पायावर उभे करण्याकरिता प्रयत्न करत आहोत आणि भविष्यातही आमचा हा प्रयत्न अधिक व्यापक स्वरुपात सुरु राहील.

या कार्यक्रमाला पोस्कोचे वरिष्ठ अधिकारी, गटविकास अधिकारी माणगाव, भागाड ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच, उपरपंच, सदस्य, पदाधिकारी, मुलींचे पालक आदी उपस्थित होते. हा उपक्रम ही केवळ आर्थिक मदत नसून ग्रामीण भागातील मुलींना स्वप्न पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची संधी देणारा ठरला आहे.

# कोर्लईत नाताळचा सण विविध कार्यक्रमांनी साजरा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

ऐतिहासिक व तीनशे वर्षांहून अधिक पारंपारिक वारसा लाभलेल्या मुरुड तालुक्यातील कोर्लईच्या माऊंट कार्मेल चर्च मधे प्रभू येशूचा जन्म दिवस नाताळ सण हर्षो उल्हासात साजरा करण्यात आला.यानिमित्ताने आठ दिवस मनोरंजनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

कोर्लईतील माऊंट कार्मेल चर्चला तब्बल तीनशेहून अधिक वर्षांचा इतिहास व वारसा लाभलेला आहे.या चर्चची स्थापना सन.१७१३ मध्ये झाली,आजही त्याच जोमाने, उत्साहाने येथील ख्रिस्ती बांधव नाताळ सण साजरा करतात.यानिमित्ताने आठवडाभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.मुंबई, पुणे,वसई अन्य ठिकाणी कामानिमित्त बाहेर असलेले बांधव एकत्रितपणे येतात. त्यामुळे गावात आनंदोत्सवाचे वातावरण असते. दि.२३ डिसेंबर रोजी चर्च लगत असलेल्या माऊंट कार्मेल हायस्कूलमध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रभू येशूचा जन्माचे एका छोट्या नाट्याद्वारे विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. त्यानंतर सांताक्लाज ने मनोरंजन नृत्य सादर करून, मुलांना चॉकलेट दिले.दि.२४ डिसेंबरच्या रात्री तसेच कामानिमित्त बाहेर असलेले मुंबई, पुणे,वसई सर्व ख्रिश्चन बांधव एकत्रितपणे येऊन प्रभू येशूचा जन्म सोहळा चर्चमधे मिस्सा बलिदान अर्पण करून आनंदाने साजरा करण्यात आला.या मिस्सा बलिदाना नंतर उपस्थित बांधवांसाठी मनोरंजनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.यावेळी माऊंट कार्मेल चर्चचे फादर बोनाव्हेंचर नुनीस यांनी सर्वांना नाताळच्या शुभेच्छा दिल्या.

# पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांचा स्नेह मेळावा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर पोलीस ठाणे येथे पनवेल शहर परिसरातील ज्येष्ठ नागरिकांचा स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला होता.

वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली या मेळाव्यामध्ये जेष्ठ नागरिकांनी उपस्थित केलेल्या सूचनांप्रमाणे पोलीस ठाणे स्तरावर करण्यात येणार्या कार्यवाही बाबत उपस्थितांना माहिती देण्यात आली तसेच सायबर सुरक्षा, डिजिटल अरेस्ट यांबाबत मार्गदर्शन करून भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहितेमधील ज्येष्ठ नागरिकांच्या अनुषंगाने तरतुदींची देखील माहिती देण्यात आली.

यावेळी पोनि. शाकीर पटेल, पोनि. अभिजीत अभंग, सपोनि. राजेंद्र घेवडेकर, सपोनि. प्रज्ञा मुंडे यांचेसह १२५-१५० ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले होते.

# महाराष्ट्र यादव चॅरिटी ट्रस्ट तळा शाखेकडून दिनदर्शिकेचे प्रकाशन उत्साहात



**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुका महाराष्ट्र यादव चॅरिटी ट्रस्ट नावीन्यपूर्ण उपक्रमा अंतर्गत प्रसिद्ध करण्यात आलेल्या दिनदर्शिका २०२६ चे शानदार प्रकाशन आणि वितरण समारंभ नुकताच गोरेगाव मुंबई येथील सन्मित्र माध्यमिक शाळेत करण्यात आला. ही दिनदर्शिका तळा तालुक्यातील गवळी ज्ञाती कुटुंबांना वितरीत करण्यात येणार आहेत.या प्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या ट्रस्ट शिखर संस्था संगमेश्वर शाखेच्या सदस्या. सरिताताई खेडेकर यांच्या शुभहस्ते दिनदर्शिका २०२६ चे औपचारिक प्रकाशन करण्यात आले. यावेळी शिखर संस्थेच्या विश्वस्त सुप्रिया पागार,तळा शाखा मुंबई अध्यक्ष अनंत धुमाळ,सरचिटणीस सु-नील रिकामे खजिनदार विनायक महाडिक,महिला अध्यक्षा ललिता काते,ड. योगिता महाडिक, राजेश गायकर, अनिल कोटकर,प्रकाश खेडेकर,अनिल काते,विलास महाडिक गजानन वरणकर, सानिका पंदेरे, सृष्टी महाडिक सर्व पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात श्रीकृष्ण पूजनाने झाली यावेळी उपस्थीत मान्यवरांनी मंडळाच्या भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा देणारे मनोगत व्यक्त केले मंडळाच्या या दिनदर्शिकेसाठी ज्या ज्ञाती बांधव जाहिरातदारांनी जाहिराती दिल्या त्यांचे आभार मानण्यात आले.मुंबई कार्याध्यक्ष अनंत धुमाळ यांनी आपल्या मनोगतात महिला कार्यकारिणीच्या कार्याचे विशेष कौतुक केले. समाजातील महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच या उपक्रमासाठी जाहिरातदार, उपस्थित मान्यवर, सभासद व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतलेल्या सर्व कार्यकारिणी सदस्यांचे त्यांनी आभार मानले. अशा प्रकारे सर्व मान्यवरांचे आभार मानून हा दिनदर्शिका प्रकाशन सोहळा यशस्वीरीत्या संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तळा मुंबई शाखेचे सचिव सुनील रिकामे यांनी केले तर आभार कार्याध्यक्ष अनंत धुमाळ यांनी मानले.

# उरणच्या द्रोणागिरी युवा महोत्सवात बहरले राज्यस्तरीय कवी संमेलन

**दै.रायगड नगरी । उरण**

दरवर्षी प्रमाणे यंदाही २५ व्या द्रोणागिरी युवा महोत्सवात राज्यस्तरीय भव्य कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. कवी संमेलनाचे अध्यक्षस्थान द्रोणागिरी असोसिएशनचे अध्यक्ष महादेव घरत यांनी भूषविले होते. कवी संमेलनाचे उद्घाटन महिला संघटक वैशाली घरत यांच्या हस्ते झाले. तर व्यासपीठावर जेएनपीएचे कामगार नेते भूषण पाटील, डॉ. उदय नामदेव घरत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या अनुषंगाने राज्यस्तरीय कवी संमेलनाची धुरा राष्ट्रीय भारत भूषण कवी गायक अरुण दत्ताराम म्हात्रे यांनी कवयित्री सुचित्रा कुंचमवार, रेशमा ठाकूर, कवी संजय होळकर, भ.पो. म्हात्रे, संजय पाटील या सर्वांच्या सहकार्याने सांभाळली.

त्यानंतर कवी-गायक अरुण द. म्हात्रे. यांनी खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे ही साने गुरुजींची विश्वप्रार्थना आपल्या सुरेल आवाजातून सादर केली. यावेळी सर्व उपस्थित मान्यवर आणि सारस्वत यांनी उभे राहून सदर प्रार्थनेला दोन्ही कर जोडून उत्तम साथ दिली. शेवटी अध्यक्षीय भाषणात महादेव घरत यांनी द्रोणागिरी युवा महोत्सवाच्या वाटचाली बद्दल मोजक्या व योग्य शब्दात छान माहिती देऊन संमेलनाच्या नियोजनाचे भरभरून कौतुक केले.

दरम्यान कवी संमेलनात राज्याच्या विविध आलेल्या ४० ते ४५ कवींनी बळीराजा, पर्यावरण संतुलन व भूमिपुत्र या दिलेल्या विषयांवर आधारित आपल्या आशयपूर्ण रचनांच्या कविता सादर करून, संमेलनाची रंगत वाढवली. यावेळी कवी संमेलनातील सहभागी कवींना मान्यवरांच्या हस्ते, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह आणि रोख दोनशे रुपये देऊन गौरविण्यात आले. यावेळी उपस्थित प्रमुख पाहुणे भूषण पाटील व डॉ. उदय घरत यांनी आपल्या मनोगतातून मार्गदर्शन केले.

# वैमानिक प्रशिक्षणाच्या नावे फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वैमानिक प्रशिक्षणाच्या नावाखाली तरुण प्रशिक्षणार्थी आणि त्यांच्या पालकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात नोंद झाली आहे.

एका संस्थेचे संचालक आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी वैमानिक प्रशिक्षणाच्या नावाखाली चार प्रशिक्षणार्थी मुलींकडून तब्बल २ कोटी ३९ लाख रुपये उकळल्याचा आरोप पालकांनी पोलिसांना दिलेल्या तक्रारीत केला आहे. बोरीवली येथील ५८ वर्षांचे सेवानिवृत्त एअर इंडिया कर्मचारी हे पीडित प्रशिक्षणार्थी मुलीचे पालक आहेत.

त्यांनी मुलीच्या प्रशिक्षणासाठी ५४ लाख रुपये (करांसह) या संस्थेत भरले होते. सप्टेंबर २०२४ पासून खारघर येथील कार्यालयातून प्रशिक्षणाचे कामकाज सुरू होते.

मुलींना दुबईमधील एका संस्थेत पाठवण्यात आले. मात्र पूर्ण शुल्क न भरल्याने प्रशिक्षण थांबविल्याने प्रशिक्षणार्थींना भारतात परतावे लागले. अद्याप या प्रकरणातील संशयीत आरोपींना अटक करण्यात आलेली नाही.



## निविदा सुचना क्र. ४२ सन २०२५-२६ (ऑफ लाईन निविदा)

कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, ता. पेण, जि. रायगड, पिन कोड-४०२१०७ दुरध्वनी क्र.०२१४३-२९९२८८ यांचेकडून महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील टक्केवारी दर (Percentage Rate) ऑफलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | निविदा उपलब्ध कालावधी | इसारा रक्कम/कोरा निविदा शुल्क | सिलबंद निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|---|
| | | चतुर्थ मागणी | | | |
| १ | RAESD/OW/065/2025-26 Providing EI with accessories for MTDC VIP Suite for Sambhaji Raje at Raigad fort, Dist-Raigad (3rd call) | रु.३,१२,४२३ | दि.२९/१२/२५ १०.०० दि.५/१/२६ ते १८.०० | १) ठेकेदार वर्ग ड वर्ग २) इसारा रक्कम रु.४००० ३) निविदा शुल्क रु.५९० | दि.०७/०१/२६ दि.११.०० वा. |
| | | द्वितीय मागणी | | | |
| २ | RAESD/CR/ 2041 /2025-26 Providing AMC to AC units at Sub-district Hospital, Court building & Govt Rest House Mangaon, Tal-Mangaon, Dist-Raigad (for 1 year) | रु.३,३६,९६१ | दि.२९/१२/२५ १०.०० ते दि.५/१/२६ ते १८.०० | १) ठेकेदार वर्ग ड वर्ग २) इसारा रक्कम रु.४००० ३) निविदा शुल्क रु.५९० | दि.०७/०१/२६ दि.११.०० वा. |
| | | प्रथम मागणी | | | |
| ३ | RAESD/OW/197/2025-26 Providing Shifting of UPS & Providing Shifting of Fans at District Civil hospital Alibag, Tal-Alibag, Dist-Raigad. | रु.३,९७,३६७ | दि.२९/१२/२५ १०.०० ते दि.५/१/२६ ते १८.०० | १) ठेकेदार वर्ग ड वर्ग २) इसारा रक्कम रु.४००० ३) निविदा शुल्क रु.५९० | दि.०७/०१/२६ दि.११.०० वा. |
| ४ | RAESD/OW/196/2025-26 Providing E.I for oxygen plant at District Civil hospital Alibag. Tal-Alibag, Dist-Raigad. | रु.५,०९,२४६ | दि.२९/१२/२५ १०.०० ते दि.५/१/२६ ते १८.०० | १) ठेकेदार वर्ग ड वर्ग २) इसारा रक्कम रु.६००० ३) निविदा शुल्क रु.५९० | दि.०७/०१/२६ दि.११.०० वा. |
| ५ | RAESD/OW/204/2025-26 Providing EI at SP bunglow in first floor Alibag. Tal-Alibag Dist-Raigad | रु.७,३७,२८७ | दि.२९/१२/२५ १०.०० ते दि.५/१/२६ ते १८.०० | १) ठेकेदार वर्ग ड वर्ग २) इसारा रक्कम रु.८००० ३) निविदा शुल्क रु.५९० | दि.०७/०१/२६ दि.११.०० वा. |

१. लिफाफा क्र.। मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे

२. कोरी निविदा / निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळावर https://mahapwd.gov.in (Pay PWD Online) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. येथून डाऊनलोड करण्यात यावी.

३. निविदा सूचना कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, ता. पेण, जि. रायगड, या कार्यालयातील सुचना फलकावर पहावयास मिळेल.

४. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामधील नोंदणीधारक वरील निर्देशित विद्युत अनुज्ञाप्तीधारक ठेकेदारच निविदा सादर करू शकतात अन्य ठेकेदाराने सादर केलेली निविदा स्विकारली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

जा.क्र./राविवि/निविदा-२/ ३७५४/२०२५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड,
ता. पेण, जि.रायगड, पिन-४०२१०७
दि. २३.१२.२०२५

सही/-
(प्र.अ.दोडे)
कार्यकारी अभियंता
रायगड विद्युत विभाग, सा.बां.पेण, रायगड

क्र.जिमाका/राअ/जाहि/३२६/२०२५-२६


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# समुद्रातील खारे पाणी भात शेतीत,हजारो एकर शेतजमीन नापीक ; खारभूमी सर्वेक्षण विभागाचे दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील खोपटा, आवरे, पिरकोन, गोठवणे, चाणजे, वशेणी, पुनाडे, विंधणे, मोठी जुई ग्रामपंचायत हद्दीतील खाडी किनाऱ्या वरील बांधबंदिस्तीच्या कामांकडे खारभूमी सर्वेक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने सदर शेत जमीनीत समुद्राचे खारे पाणी शिरत आहे. त्यामुळे हजारो एकर शेतजमीन नापीक होण्याचा धोका निर्माण झाला आहे.तरी खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग पेण येथील अधिकाऱ्यांनी बांधबंदिस्तीची कामे मार्गी लावावीत अशी मागणी शेतकरी करत आहे. उरण परिसरातील पुर्व विभागातील व चाणजे ग्रामपंचायत हद्दीतील शेतकऱ्यांच उपजिविकेच साधन भात शेती आहे.परंतु गेली अनेक वर्षे खाडी किनाऱ्यावरील बांधबंदिस्तीची कामे न केल्याने समुद्रातील खारे पाणी भात शेतीत शिरत आहे. त्यात जेएनपीए व करंजा बंदरात या अगोदर करण्यात आलेल्या दगड मातीच्या भरामुळे समुद्रातील उधाणाचे पाणी हे सातत्याने भात शेतीत शिरत आहे.एकंदरीत शेतकऱ्यांच उपजिविकेच साधन धोक्यात येत असताना,शासन पुन्हा एकदा चाणजे ग्रामपंचायत हद्दीतील १०० एकर जागेवर भराव टाकून मल्टिमॉडेल लॉजिस्टीक पार्क उभारण्याच्या तयारीत असून एम आय डी सी आणि मेरिटाईम बोर्डाने त्यासाठी जागा निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.



त्यामुळे चाणजे, खोपटा,गोवठणे,वशेणी,पुनाडे,आवरे,पिरकोण, विंधणे,मोठी जुई ग्रामपंचायत हद्दीतील उरल्यासुरल्या भात शेतीत उधाणाचे पाणी शिरुन खारफुटीचे जंगल वाढण्याचा तसेच भातशेती नापीक होण्याचा संभव आहे. तरी खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग पेण येथील अधिकाऱ्यांनी पाहणी करून बांधबंदिस्तीची कामे मार्गी लावावीत अशी मागणी शेतकरी करत आहे.

# तळा तालुक्यातील नवसाला पावणारी वानस्तेकरीण श्री काळकाई देवी भाविकांचे श्रद्धास्थान

**दै.रायगड नगरी । तळा**

चांद्रसेनीय कायस्थ प्रभू (सी के पी )ज्ञातीची श्री काळकाई देवी जागृत देवस्थान आहे.माजी केंद्रीय अर्थ मंत्री कै सी.डी. देशमुखांचं हे गाव. इथल्या समस्त देशमुख, कुळकर्णी,प्रधान आदि प्रभु कुटुंबियांचे श्रद्धास्थान असलेली ग्रामदेवता श्री चंडीका देवी.श्री काळकाई देवी देशमुख, कुळकर्णी, प्रधान यांची कुलदैवता आहे.या मंदिरात श्रीबापूजी बुवा, श्री योगेश्वरी व श्रीकालकाई च्या देखण्या मूर्ती आहेत. दक्षिणाभिमुखीपाषाणी मुर्ती आहेत.

अतिशय कडक उग्ररुप जागृत कुमारीका देवी आहे.पुर्वी छोटे मंदिर,पायरी चढून मंदिरात प्रवेश होत असे समोर मंडप असायचा. कालांतराने सुधारणा होत गेली आणी मंदिराचा जिर्णोद्धार अंदाजे २०वर्षा पूर्वी करण्यात आला.प्रशस्त सभागृह,एका बाजुला भोजन कक्ष,स्वच्छता गृह बसण्याची व्यवस्था,पाणी वीज रंग रंगोटी निसर्ग रम्य शांत वातावरण साफ सफाईविद्युत रोषणाई मनाला भुरळ पडते या देवीचा पौष शुद्ध ६ षष्ठी पुर्नदर्शन सोहळा मोठ्या उत्साहात भक्ती भावाने साजरा केला जातो. या धार्मिक सोहळ्याचे निमित्ताने सकाळी ८ ते १० षोडशोपचारे पुजा, महाआरती ९ ते१०.३० अल्प-ोपहार, १०.३०ते १२ हळदी कुंकू समारंभ,१२ ते १२.३० करमणूकीचे कार्यक्रम दुपारी १२.३०ते२.३०महाप्रसाद ,दुपारी ३ते४सभा व आभार अशा भरगच्च कार्यक्रम चे आयोजन वानस्तेकरीण सेवा समीती. याचे कडून करण्यात आले आहे.



श्री कालकाई देवी तालुक्यातील अनेक भाविकांचे श्रद्धा स्थान आहे.कौटुंबिक समस्या सुटण्यासाठी नवस केले जातात नोकरी, घंदा, लग्न,आजारपण, संतान प्राप्ती अशा समस्या चे निराकरण करून भक्तांना आशेचा किरण देते.केलेले नवस फेडण्यासाठी अनेक भावीक येतात. पंचक्रोशीतील भाविकांची श्रद्धा स्थान असून मनोकामना पुर्ण झाल्या आहेत भक्त गण दर्शनासाठी उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतात तळेकर प्रभू ज्ञाती बांधवा समवेत पुणा, ठाणे मुंबई, गुजरात,बडोदा, मुंबई पनवेल उपनगरातून पेण,रोहा इंदापूर,माणगांव महाड अशा ठिकाणाहून नातेवाईक आप्तेष्टमित्रमंडळी आवर्जुन उपस्थित राहून श्री काळकाई चे उत्सवात सहभागी होऊन भक्ती भावाने दर्शन लाभ घेतात. अश्विन शुद्ध प्रतिपदा ते विजया दशमी दसऱ्या पर्यत घटी बसवली जाते.

अहोरात्र जागर वानस्तेनास्करकुटुंब ग्रामस्थ करतात.चैत्र पौर्णिमेच्या दिवशी होलीकोत्सव साजरा केला जा-तो व त्यानंतर स्थानापासून संपूर्ण गावात घरोघरी आईची पालखी मिरवणूक काढली जाते. सागंता दुपारी ३/३वाजता होते.अनेक भक्त गण तीचे उपासक आहेत व नेहमी दर्शनासाठीयेतअसतात. देवस्थान ची देखभाल वानस्तेकरीण काळकाई सेवा समीती व देशमुख कुटबीय प्रभू ज्ञाती करीत असते. शिवकाळात देशमुख, प्रधान, कुळकर्णी हे शिवदरबारी चाकरी करीत असत त्यांना गुजराण करण्यासाठी जमीनी दि्ल्या. कुलदेवतेच्या ठिकाणीदेशमुखकुटुंबाची शेती वाडी जागा जमीनी होत्या.असा इतीहास साक्ष सांगतो.या देवीची मंदिरे वानस्ते, कडापे (निजामपूर) खाजणी या ठिकाणी देखील आहेत. या आई श्री काळकाई चा महीमा अगाध असून जागृत देवस्थान असलेली, भक्तांना अभय देणारी नवसाला पावणारी श्रद्धा स्थान आहे.

# माणगांवात कोकण फेस्टिव्हल -२०२५ यशस्वी व उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । माणगाव**

शुक्रवार दिनांक १२ ते २२ डिसेंबर २०२५ रोजी रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण व कोकणचे मुख्य प्रवेशद्वार माणगांव येथे कोकण फेस्टिव्हल- २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. १२ डिसेंबर २०२५ रोजी उद्घाटन समारंभ भव्य-दिव्य व उत्साहात संपन्न झाले. जेष्ठ अभिनेत्री अलका कुबल व चला हवा येवु फेम डॉ.निलेश साबळे हे या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे व सेलिब्रेटी म्हणून उपस्थित होते, माणगांवच्या नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे,उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. सुर्यवंशी, पोलीस निरीक्षक निवृत्ती बो-हाडे,जेष्ठ समाज सेवक अण्णा साबळे, माणगांव तालुका व्यापारी असोसिएशन्सचे अध्यक्ष लक्ष्मण दळवी, कॅप्टन नीरमल सिंग रांधवा, समाज सेविका श्रीमती. सुवर्णाताई जाधव, नगरसेवक आजित तार्लेकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

महाराष्ट्रील विविध श्रेत्रातील उल्लेखनीय काम करणा-या सांगली, सातारा, अकोला, नागपूर, परभणी, खेड, दापोली, मंडणगड, चिपळूण, रतनागीरी, मुंबई व पुणे येथील आलेल्या विविध श्रेत्रातील असामान्य व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. खास करून माणगांवमधील पत्रकार बंधु व महिला उद्योजिका यांचा मान्यवर यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

कोकण फेस्टिव्हल- २०२५ मध्ये माणगांव मधील कामेरकर हायस्कूल व जावळी हायस्कूल मधील शाळा व कॉलेजमधील विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम, महाराष्ट्रातीब ठराविक शॉर्ट फिल्म फेस्टिव्हल याशध्ये जेष्ठ अभिनेते जयराज नायर यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्याताले, लावण्यवती अप्सरा स्व-ाती पुणेकर यांचा लावणी महोत्सवकार्यक्रम, गीतगायन, काव्य वाचन, अभिनय स्पर्धा यामध्ये माणगांव मधील शिक्षणसम्राट राजीव साबळे, जेष्ठ साहित्येक ए.व्ही. जंगम व कोकण मराठी साहित्य परिषद, माणगांव शाखेचे साहित्यीक यांनी विशेष व प्रमुख पाहुणे म्हणून हजेरी लावली. गौतमी पाटील हिचा डान्स नजराणा, रायगड जिल्हा बॉडी बिल्डींग असोसिएशन्स अनिकेत कदम मार्फत बॉडी बिल्डींग स्पर्धा, काही तांत्रिक अडचणींमुळे ऑल द बेस्ट नाटक पुढे ढकलून प्रेक्षकांमधील सुप्त कला गुणांना वाव देण्यासाठी खुले स्व. दादा कोंडके व स्व. लक्ष्मीकांत बेर्डे रंगमंच उपलब्ध केले होते, शैला पंदीरकर व देव घरत मार्फत मिस कोकण सुंदरी स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये माणगांव नगरपंचायतच्या उपनगराध्यक्ष रीया रत्नाकर उभारे, रत्नाकर उभारे व नगरसेविका ममता थोरे - शेठ प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. खुल्या रेकॉर्ड डान्स स्पर्धेत सर्वांचे लाडके व गोर गरींबांचे कैवारी मंत्री भरतशेठ गोगावले, माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार व सहकारी पारितोषिक वितरण समारंभत उपस्थित होते.

पुण्यातील सुप्रसिद्ध पुजा सोंडकर, माणगांव यांचा सदाबहार सप्तरंगी ऑर्केस्टा सादर करण्यात आला, सदर कार्यक्रमास माणगांवमधील जेष्ठ समाज सेवक अशोकभाई धारीया, डॉ.सचिन चव्हाण, डॉ. चंद्रशेखर , उद्योजक सचिन देसाई, घनश्याम शेठ, सर्वोत्कृष्ट सुत्रसंचालिका निलीमा काम मॅडम यांच्या प्रमुख उपस्थितीत व शुभ हस्ते पत्रकार व महिला उद्योजिका यांचा विशेष सत्कार करून सांस्कृतिक कार्यक्रमासह गोड निरोप समारंभ यंदाच्या पहिल्यांच कोकण फेस्टिव्हलमधील शेवटचा कार्यक्रम यशस्वी संपन्न झाला.

हितेनभाई छेडा आयोजित सदर कोकण फेस्टिव्हल- २०२५ ला सर्व श्रेत्रातील मान्यवर यांनी हजेरी लावली व रसिक प्रेक्षकांनी तुफान व प्रचंड गर्दी करीत भरभरून प्रतिसाद दिला. सदर फेस्टिव्हल मधील सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वी करण्यात रायगड सांस्कृतिक कला मंडळ, महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक नातं जपणार व्यासपीठचे सर्वेसर्वा डॉ.अजय आत्माराम मोरे ( संस्थापक - अध्यक्ष) व अंकीता अजय मोरे (सेक्रटरी), सहकारी पत्रकार बंधु,महिला, मॅनेजमेंट टिम या सर्वांनी मोठ्या जिद्दीने सर्व कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली.

# उमेश पाटील कर्जतचे नवीन पोलीस निरीक्षक

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांची श्रीवर्धन पोलीस ठाण्यात बदली झाली असून त्यांच्या रिक्त जागेवर उमेश पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पाटील हे श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत होते. ही खांदेपालट झाली असली तरी भोसले यांची सहा महिन्यातच बदली झाल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# बसमध्ये चढताना मोबाईल चोरला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्थानकाबाहेर एनएमएमटी बसथांब्यावरून चढताना २३ वर्षीय तरुणाचा ५० हजार रुपये किमतीचा आयफोन चोरल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

मोहित सूर्यवंशी हा नॅशनल रेजन्सी, तक्का येथे राहत असून, कॉलेजला जाण्यासाठी पनवेल रेल्वे स्थानकात आला. मेगाब्लॉक असल्याने पनवेल-ठाणे बस पकडताना गर्दीचा गैरफायदा घेत चोरट्याने त्याच्या खिशातील मोबाईल पळविला.

त्याने तक्रार केल्यावर बस कामोठे पोलिस ठाण्यात नेण्यात आली. पोलिसांनी बसमधील प्रवाशांना तपासले असता, मोबाइल सापडला नाही.


## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना ह्या जाहीर नोटीसीद्वारे कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी युनिट / रो हाऊस नं १९, मंदार को ऑप. हौसिंग सोसायटी लि. प्लॉट नं सी-३, सेक्टर-६ नवीन पनवेल (पू), ता. पनवेल जि. रायगड-४१०२०६ हि मिळकत नंदगोपाल शंकर गुप्ता राहणार रिद्धी सिद्धी रेसिडेन्सी, फ्लॅट नं, ए-३०१, प्लॉट नं ५३ आणि ५३ए सेक्टर नं ३, नवीन पनवेल, ता- पनवेल जि. रायगड-४१०२०६ ह्यांचेकडून खरेदी खताने कायमस्वरूपी खरेदी करण्याचे योजिले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**युनिट/रो हाऊस नं-१९, मंदार को ऑप. हौसिंग सोसायटी. लि. प्लॉट नं सी-३, सेक्टर-६ नवीन पनवेल (पू), ता. पनवेल जि. रायगड-४१०२०६ (३२ चौ. मीटर)**

वरील नमूद मिळकतीस अनुसरून कोणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, भागीदारी व अन्य इत्यादी कोणत्याही प्रकारचा दान, तारण, गहाण, खरेदी, कर्ज, पोटगी, वहिवाट, व बक्षीस इत्यादी द्वारे मालकी अथवा इतर कोणताही हक्क व हितसंबंध असल्यास सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाचे आत कोणाचेही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे आशिल सदर वरील नमुद मिळकतीचे खरेदीखत अनुशंगिक दस्त कायदेशीर प्रमाणे पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून आलेल्या कसल्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

दिनांक : २५/१२/२०२५

सही/-

**ॲड. प्रमोदिनी प्रकाश सावंत**
**पद्मावती सी.एच.सो. प्लॉट न ९६, ऑफिस नं १ स्वामी नित्यानंद मार्ग, पनवेल, रायगड-४१०२०६**



## सावधान नोटीस

तमाम जनतेस या सावधान नोटीसद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. बळीराम सिताराम मांडे, रा. मौजे तळेगाव, ता. खालापुर, जि. रायगड, असून खाली नमुद केलेली शेत जमिन मिळकत ही आमचे अशिलांची आणि सहहिस्सेदार यांच्या मालकीची व ताबा कब्जा वहीवाटीत पूर्वापारापासून आजरोजी पर्यंत आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बारवई, ता. पनवेल, जि. रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार |
|---|---|---|---|
| १ | ११५/१/अ | २-७६-६०<br>पो.ख. ०-२५-३०<br>एकूण ३-०१-९० | १८.६९ |
| २ | ११५/२/ब | ०-११-९० | १.६२ |
| ३ | ११६ | ०-१७-४० | १.१९ |

वर नमुद मिळकती बाबत पनवेल येथिल मा. उपविभागीय अधिकारी साहेब पनवेल यांचे कोर्टात आर. टी. एस. अपिल क्र. ४३९/२०२५ या क्रमांकाचे अपिल आमचे अशिलांनी दाखल केले असून सदर अपिल गुणवत्तेवर निकालाकरीता बंद केले असून सदर प्रकरणात अंतिम निकालापर्यंत स्थगिती आदेश कायम केलेले आहेत. मात्र आमचे अशिलांस असे खात्रीलायक रीत्या कळले आहे की, वर नमुद शेतजमिनीचे सात बारा सदरी नुकतेच नोंद करण्यात आलेले मे. पर्सेपिना डेव्हलपर्स प्रा. लि. कंपनी तर्फे अधिकारी सदर वर नमुद मिळकत त्रयस्त इसमांस विकण्याचे तयारीत आहेत.

तरी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, वर नमुद शेत जमिनीमध्ये आमचे अशिलांचे मालकी हक्क हितसंबंध असून सदर मिळकत आमचे अशिलांचे ताबा कब्जा वहीवाटीत व कसवणुकीत आहे. तसेच वर नमुद मिळकतीबाबत मा. उपविभागिय अधिकारी पनवेल येथे आर. टी. एस. अपिल क्र. ४३९/२०२५ मध्ये स्थगिती आदेश अस्तित्त्वात असल्याने सदर मिळकत ही न्यायप्रविष्ट आहे. तसेच सदर मिळकती संर्दभात झालेले तथाकथित दस्त रद्द करणे करीता मा. दिवाणी न्यायालय पनवेल येथे दावा दाखल करण्याची तजविज आमचे अशिलांनी सुरू केली आहे. सबब सदर मिळकती संदर्भात कोणीही, कसल्याही प्रकारची खरेदी विक्री किंवा तत्सम कोणताही व्यवहार कोणत्याही इसमांसोबत करू नये.

वरीलनुसार सावधान नोटीस दिल्यानंतर देखील कोणीही सदर दावा मिळकती संदर्भात कोणताही व्यवहार केल्यास त्यापासून होणा-या परीणामाकरीता व नुकसानीकरिता अशी व्यक्ती स्वतः जबाबदार राहील. तसेच आमच्या अशिलांचे होणा-या नुकसानीकरीता देखील सदर व्यवहार करणारा त्रयस्त इसम जबाबदार राहील तसेच सदरचा इसम फौजदारी व दिवाणी कारवाईस पात्र राहील आणि सदर बाबतची कसलीही जबाबदारी आमच्या अशिलांवर राहणार नाही; यांची नोंद तमाम जनतेने घ्यावी.

दिनांक : २६/१२/२०२५
ठिकाण : पनवेल

सही/-

**ॲड. प्रगती दिनेश ठाकूर**
**नगरपालीका शॉपींग कॉम्प्लेक्स, ऑफीस क्र. २२, आद्य क्रातिंवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ, पनवेल, रायगड**
**मो. नं. ९१७२५६१११११**



ॲड. केवल गावंड

## जाहीर नोटीस

उरण येथील मे दिवाणी न्यायाधिश साहेब क स्तर यांचे कोर्टात
दिवाणी चौकशी अर्ज क्र. ३४०/२०२५
नि.नं.८/ड

१) श्री गजानन हसुराम कडू
रा-श्रीराम सदन रोहाऊस, प्लॉट नं. ए/६, सेक्टर ७, खांदा कॉलनी, नवीन पनवेल, ता-पनवेल, जि. रायगड.
२) सौ सिमा सुरेश घरत
रा-श्री गणेश बंगला, रोड नं. १७, सेक्टर १९, पोस्ट ऑफिसजवळ, नवीन पनवेल, ता-पनवेल, जि रायगड
३) सौ रंजना रमेश भोईर
रा-ब्रीज व्ह्यु अपार्टमेंट, एन. एल. ६/७/५, सेक्टर २, नेरूल, नवी मुंबई
४) कै मथुराबाई दत्तात्रेय तांडेल मयत तर्फे वारस
४/१ श्री हेमंत दत्तात्रेय तांडेल
रा-नवघर, ता-उरण, जि. रायगड
४/२ सौ मिनाक्षी प्रभाकर ठाकूर
रा-चिरनेर, ता-उरण, जि. रायगड
४/३ सौ नंदिनी संतोष म्हात्रे
रा-भोम, ता-उरण, जि. रायगड
४/४ सौ वैशाली हर्षवर्धन पोपेटा
रा-वास्तु को ऑ हौसिंग सोसायटी, दुसरा मजला, रूम नं. २०२, कळंबोली, ता-पनवेल, जि. रायगड अर्जदार — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै बिरसूबाई हाशा उर्फ हसुराम कडू यांचे दिनांक १०/१०/२००७ गेजी श्रीराम सदन रोहाऊस, प्लॉट नं. ए/६, सेक्टर ७, खांदा कॉलनी, नवीन पनवेल, ता-पनवेल, जि. रायगड येथे राहत्या घरी निधन झालेले आहे तसेच कै. बिरसूबाई हाशा उर्फ हसुराम कडू यांची मुलगी कै मथुराबाई दत्तात्रेय तांडेल यांचे दिनांक ०७/०८/२०१० रोजी मौजे नवघर, ता-उरण, जिल्हा-रायगड येथे राहत्या घरी निधन झालेले आहे तसेच कै. बिरसूबाई हाशा उर्फ हसुराम कडू यांचे पती कै हसुराम नागू कडू यांचे दिनांक २१/०५/१९७६ रोजी मौजे नवघर, ता-उरण, जिल्हा रायगड येथे निधन झालेले आहे कै विरसूबाई हाशा उर्फ हसुराम कडू यांना अर्जदार क्र. १ ते ४/४ हे वारस आहेत कै विरसूबाई हाशा उर्फ हसुराम कडू यांच्या सहमालकीची व ताबे कब्जे, वहीवाटीतील संपादित शेतजमिन मिळकत खालील वर्णन केल्या प्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:**

| अ.क्र. | मौजे/यु.के.नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | नवघर ।।। १०७/८३ | ८२ | २ | ०-११-० |
| | | ९७ | ७ | ०-०३-३ |

सबब वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, अधिकार व हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झालेचे -तारखेपासुन ३० दिवसांचे आत स्व:त अथवा या मे कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होउन लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यास मे. कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही, तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेऊन मे. कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद। नोंद घ्यावी.

आज तारीख १९ माहे १२/२०२५ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**



ॲड. केवल गावंड

## जाहीर नोटीस

उरण येथील मे दिवाणी न्यायाधिश साहेब क स्तर यांचे कोर्टात
दिवाणी चौकशी अर्ज क्र. ३४२ /२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.३/२/२०२६

श्री अरूण आत्माराम कडू व इतर — अर्जदार

विरूद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै आत्माराम रामदास कडू यांचे दिनांक २३/०३/२००३ रोजी मौजे सोनारी, तालुका-उरण, जिल्हा रायगड येथे निधन झालेले आहे तसेच कै आत्माराम रामदास कडू यांची पत्नी कै कृष्णाबाई आत्माराम कडू यांचे दिनांक २९/१२/२००५ रोजी मौजे सोनारी, तालुका-उरण, जिल्हा-रायगड येथे निधन झालेले आहे तसेच कै आत्माराम रामदास कडू यांची आई कै काशीबाई रामदास कडू यांचे सुमारे ५० ते ६० वर्षापुवीच निधन झालेले आहे. तसेच कै आत्माराम रामदास कडू यांचा मुलगा कै यशवंत आत्माराम कडू यांचे दिनांक २५/११/२०२२ रोजी मौजे सोनारी, तालुका-उरण, जिल्हा-रायगड येथे निधन झालेले आहे. तसेच कै आत्माराम रामदास कडू यांचा मुलगा कै महेश आत्माराम कडू यांचे दिनांक ०२/०३/१९९५ रोजी मौजे- सोनारी, तालुका-उरण, जिल्हा-रायगड येथे निधन झालेले आहे. तसेच कै आत्माराम रामदास कडू यांची सुन कै रेखा महेश कडू यांचे दिनांक ०५/०७/२०१० रोजी ज्योती केअर सेंटर कळंबोली, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड येथे निधन झालेले आहे तसेच कै आत्माराम रामदास कडू यांचा मुलगा कै जयवंत आत्माराम कडू यांचे दिनांक १७/०२/२०१० रोजी मौजे- सोनारी, तालुका-उरण, जिल्हा-रायगड येथे निधन झालेले आहे तसेच कै आत्माराम रामदास कडू यांची मुलगी कै तुलसाबाई रघुनाथ घरत यांचे दिनांक २५/१२/२०२४ रोजी मौजे धुतुम, तालुका-उरण, जिल्हा-रायगड येथे निधन झालेले आहे. तसेच कै आत्माराम रामदास कडू यांची नात कै संगिता भरत म्हात्रे हिचे दिनांक ०३/०१/२०२४ रोजी मौजे जासई, तालुका-उरण, जिल्हा-रायगड येथे निधन झालेले आहे. कै आत्माराम रामदास कडू यांना अर्जदार क्र.१) श्री अरूण आत्माराम कडू राहणार-सोनारी, ता-उरण, जि. रायगड २) श्रीमती कुसुम रामदास पाटील राहणार-मु मुलेखंड, ता-उरण, जि. रायगड ३) श्रीमती जयश्री विकास म्हात्रे राहणार-मु खोपटे, ता-उरण, जि. रायगड ४/१) श्रीमती शांता यशवंत कडू ४/२) श्री देवेश यशवंत कडू ४/३) कु भारती यशवंत कडू अर्जदार क्र ४/१ ते ४/३ राहणार-हरी महिमा को हौ सो, रूम नं १०२, प्लॉट नं ९९/१००, सेक्टर १०, न्यु पनवेल, ता-पनवेल, जि. रायगड ४/४) सौ ज्योती कृष्णा गायकवाड राहणार-ओवळे, ता-पनवेल, जि.रायगड ४/५ ) सौ सारिका समीर कडू राहणार-सोनारी, ता-उरण, जि. रायगड ४/६) सौ आरती यशवंत म्हसकर राहणार-खरसाई, ता-म्हसळा, जि-रायगड ५/१ ) सौ ममता निलेश नाईक राहणार : सोनारी, ता-उरण, जि. रायगड ६/१ ) श्रीमती निर्मला जयवंत कडू ६/२ ) श्री हितेश जयवंत कडू वरील राहणारः सोनारी, ता-उरण, जि. रायगड ६/३ ) श्रीमती वनिता मच्छिंद्रनाथ पाटील राहणारः खोपटे, ता. उरण, जि. रायगड ६/४) सौ रजनी किशोर कडू राहणारः सोनारी, ता. उरण, जि. रायगड ६/५ सौ सुनिता महेंद्र पाटील राहणारः उरण, ता. उरण, जि. रायगड ७/१ ) श्री जयेश रघुनाथ घरत राहणार-धुतुम, ता-उरण, जि. रायगड ७/२ ) सौ विजया भगवान गायकवाड राहणार-ओवळे, ता-पनवेल, जि. रायगड ७/३) सौ शिल्पा तानाजी जितेकर राहणार-दापोली, ता-पनवेल, जि. रायगड ७/४/१) श्री निकेतन भरत म्हात्रे ७/४/२) कु दिप्ती भरत म्हात्रे ७/४/३) प्रतिक्षा करण म्हात्रे वरील जासई , ता-उरण, जि. रायगड रायगड हे वारसदार आहेत कै आत्माराम रामदास कडू यांच्या मालकीची व तावे कब्जे वहीवाटीतील शेत जमिन मिळकत खालील वर्णन केल्या प्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :**

| अ.क्र. | मौजे/यु.के.नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | सावरखार ।। २२/८३ | ५२ | ४ | ०.०७.६ |
| | | १२८ | १ | ०.१६.९ |

सबब वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, अधिकार व हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासुन ३० दिवसांचे आत स्व:त अथवा या मे. कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होउन लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यास मे. कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही, तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेऊन मे. कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

आज तारीख २३ माहे डिसेंबर २०२५ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

नाताळाची सुट्टी आणि वाहतुकीची कोंडी

# मुंबई पुणे महामार्गावर वाहनांची कोंडी, वाहनांच्या रांगा

**दै.रायगड नगरी अलिबाग**

नाताळाच्या सुट्टीचा आनंद लुटण्यासाठी मुंबईकर मोठ्या संख्येनी बाहेर पडले आणि ठिकाणी झालेल्या वाहतुक कोंडीत अडकून पडले. गुरुवार-ीअसेच काहीसे चित्र मुंबई गोवा महामार्गासह, मुंबई पुणे दृतगती मार्गावर पहायला मिळाले. हजारो वाहने एकाच वेळी रस्त्यावर आल्याने वाहतुकीच नियमन करणे अशक्य झाले होते.

नाताळाचा सण आणि सलग आलेल्या सुट्ट्यांचा आनंद साजरा करण्यासाठी मुंबईकर मोठ्या संख्येनी बाहेर पडले. त्यामुळे रस्ते वाहतुकीचा पुरता बोजवारा उडाला. मुंबईहून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या दृतगती मार्गावरची वाहतुक बुधवारी सकाळपासून कोलमडली होती.



वाहनांची संख्या वाढल्याने घाट परिसरात वाहतुक कोंडी झाली होती. सात ते आठ किलोमिटरच हे अंतर पार करण्यासाठी जवळपास दिड ते दोन तास लागत होते. त्यामुळे प्रवासी आणि वाहनचालक चांगलेच वैतागले होते. संथवाहतुकीमुळे घाटात वाहने नादुरुस्त होण्याचे प्रमाणही खुप होते.

दुसरीकडे मुंबई गोवा महामार्गावरील वाहतुक धिम्या गतीने सुरु होती. पेण ते वडखळ या पट्ट्यात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. काही बेशीस्त वाहनचालक लेनची शिस्त पाळत नसल्याने या समस्येत अधिकच भर पडत होती. वडखळ ते अलिबाग या मार्गावरही वाहतूक संथ गतीने सुरू होती.

वाहनांची संख्या अचानक वाढल्याने वाहतुकीचे नियमन करण्यात पोलीस अपयशी ठरत होते.

नाताळ सण आणि सलग लागुन आलेल्या सुट्ट्या लक्षात घेऊन कोकणात मोठ्या प्रमाणात पर्यटक दाखल झाले. मांडवा, किहिम, अलिबाग, नागाव, मुरुड, काशिद समुद्र किनारे पर्यटकांनी गजबजून गेल्याचे दिसून आले. गेट वे ऑफ इंडीया ते मांडवा दरम्यान चालणाऱ्या जलवाहतुकीवर यामुळे प्रचंड ताण पडत होता.

प्रवाश्यांची संख्या घेऊन जादा बोटी सोडण्यात आल्या. हॉटेल्स आणि लॉजेसवर हाऊस फुल बुकींग झाल्याचे यानिमित्याने पहायला मिळाले.

अलिबाग परिसरात गेल्या दोन दिवसात २० हजारहून अधिक पर्यटकांनी हजेरी लावल्याचे सांगीतले जात आहे.

## गैरकायदेशीररित्या विक्रीकरिता घेवून जात असलेले गोमांस झायलो गाडीसह पोलिसांच्या ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील पळस्पे गावाजवळील पुलावर पनवेल शहर पोलिसांनी जागृत नागरिकांच्या मदतीने एक झायलो गाडी ताब्यात घेतली असून त्यामध्ये गोवंश जातीचे चार बैलाची गैरकायदेशीर कत्तल करून त्यांचे मांस महाड येथून गोवंडी मुंबई येथे गैरकायदेशीररित्या विक्रीकरिता घेवून जात असताना ताब्यात घेण्यात आले असून याप्रकरणी तिघा जणांना ताब्यात घेतले आहे.

पनवेल जवळील पळस्पे गावासमोरील पुलावर पनवेल शहर पोलिसांच्या पथकाने झायलो गाडी क्रं.एमएच-०४-डीवाय-२४२१ ही अडवून तिची तपासणी केली असता या गाडीमध्ये गोवंश जातीचे चार बैलाची गैरकायदेशीर कत्तल करून त्यांचे मांस महाड येथून गोवंडी मुंबई येथे गैरकायदेशीररित्या विक्रीकरिता घेवून जात असताना ताब्यात घेण्यात आले असून याप्रकरणी तिघा जणांसह झायलो गाडी व कत्तल केलेले मांस असा एकूण ३ लाख १० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे.

## मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक कोंडीचा तिढा सुटता सुटेना

**दै.रायगड नगरी । कोलाड**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरुन मुंबई, ठाणे, तसेच पुणे येथून २५ डिसेंबर रोजी ना-ताळची सुट्टी असल्यामुळे असंख्य पर्यटक सुट्टीचा आनंद घेण्यासाठी कोकणात निघाले आहेत.परंतु खांब,कोलाड, इंदापूर,माणगांव, येथील चौपदरी करणाच्या अपूर्ण कामामुळे येथे प्रवाशी वर्गाला वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.यामुळे हा वाहतूक कोंडीचा तिढा केव्हा सुटणार असा सवाल प्रवाशी वर्गातून व्यक्त करण्यात येत असुन वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी रायगड पोलिसांकडून शर्थिचे प्रयत्न सुरु आहेत.

गुरुवार दि.२५ डिसेंबर रोजी नाताळची सुट्टी तसेच आल्हादायक थंडी असल्यामुळे याचा आनंद घेण्यासाठी मुंबई,ठाणे पुणे,तसेच देशाच्या



कानाकोपऱ्यात असंख्य पर्यटक मुंबई-गोवा हायवे वरुन एसटीबस, फोर व्हिलर, रिक्षा, टू व्हीलर, तसेच इतर वाहनांनी कोकणात निघाले आहेत. परंतु मुंबई-गोवा हायवे वरील खांब, कोलाड, इंदापूर, माणगाव,येथील अपूर्ण कामामुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असुन वाहतूक कोंडी निर्माण झाली.

मुंबई-गोवा हायवे वरील कोलाड येथे उड्डाण पुलाचे काम सुरु आहे.तसेच पुलाच्या बाजूला सर्व्हिस रोडचे ही काम सुरु आहे.या खांब येथील ब्रिजचे काम सुरु आहे. असल्यामुळे येथे अपूर्ण रस्त्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे.परंतु कोलाड सपोनि नितीन मोहिते तसेच पोलिस कर्मचारी,वाहतूक पोलिस,जागोजागी उभे राहून वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी शर्थिचे प्रयत्न करीत आहेत.

## ख्रिसमस, सरत्या वर्षाला निरोप, नवीन वर्षाचे स्वागत

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील एलिफंटा बेटावर ख्रिसमस, सरत्या वर्षाला निरोप, नवीन वर्षाचे स्वागत आणि लेणी पाहण्यासाठी येणाऱ्या देशी विदेशी हजारो पर्यटकांच्या सुरक्षेतेसाठी सर्वच शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांनी खबरदारी घेण्याचे आवाहन मोरा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल काटवाणी यांनी केले आहे.

जगप्रसिद्ध एलिफंटा बेटावर दरवर्षी ख्रिसमस,सरत्या वर्षाला निरोप, नवीन वर्षाचे स्वागत आणि लेणी पाहण्यासाठी येणाऱ्या देशी विदेशी हजारो पर्यटक येतात. ख्रिसमसपासुन नुतनवर्षाच्या सुरवातीपर्यत बेटावर येणाऱ्या हजारोंच्या संख्येने येणाऱ्या पर्यटकांमुळे गर्दी होते.

पर्यटकांच्या गर्दीमुळे त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो.यामुळे पर्यटकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

पर्यटकांची सुरक्षिततेसाठी खबरदारीची उपाययोजना करण्याच्या उद्देशाने मंगळवारी (२३) एलिफंटा बेटावर शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांची



बैठक बोलाविण्यात आली होती.मोरा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक राहुल काटवाणी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीसाठी ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. मीना भोईर, उप सरपंच बळीराम ठाकूर,महाराष्ट्र सागरी मंडळ एलिफंटा जेट्टीचे बंदर निरीक्षक विनायक करंजे, गेटवे जलवाहतूक संस्थेचे नासिर मारणे,एलिफंटा लोकल गाईडचे प्रतिनिधी, दुकानदार व हॉटेल व्यावसायिकांचे प्रतिनिधी, एलिफंटा लेणी येथील कार्यालयाचे सिक्युरिटी , स्थानिक नागरिक तथा कर्मचारी आदी उपस्थित होते.

ख्रिसमस ,वर्षाअखेरीसव नवीन वर्षाच्या निमित्ताने सुट्ट्यांमध्ये बेटावर येणाऱ्या पर्यटकांची मोठी गर्दी होत असते. पर्यटकांना मनसोक्त पर्यटनाचा आनंद घेता यावा तसेच बेटावर येणाऱ्या देशी -विदेशी हजारो पर्यटकांच्या सुरक्षेतेसाठी सर्वच शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांनी खबरदारी घेण्याचे आवाहन मोरा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल काटवानी यांनी केले.

## मोठीजुई गावाने नवीन पायंडा पाडला : महेंद्रशेठ घरत

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील मोठीजुई गाव हे एकेकाळी उरण तालुक्यातील दुर्लक्षित गाव समजले जात होते; परंतु या गावात ग्रामस्थांनी एकीचे बळ दाखविले. नुकतेच एका तरुणाचे अपघात दुर्दैवी निधन झाले. गावातील तरुणांनी व्हॉटसअप ग्रुपच्या माध्यमातून त्या तरुणाला आर्थिक साह्य म्हणून प्रत्येकी १०० रुपये मदतीचे आवाहन केले. त्याला प्रतिसाद म्हणून चक्क साडेसात लाख रुपये जमा झाले. हा मोठीजुई गावाने उरण तालुक्यात नवीन पायंडा पाडला आणि आदर्शही घडवला आहे, त्याबद्दल सर्व ग्रामस्थांचे, विशेषतः तरुणांचे मनापासून अभिनंदन! तसेच टेनिस क्रिकेट सामने आज गावोगावी होत आहेत; परंतु वातानुकूलित व्यासपीठ, चांदीचा चषक, विजेत्यांना चांदीच्या अंगठ्या, क्रिकेट रसिकांना लकी ड्रा द्वारे बक्षीस देण्याचा आणखी एक नवीन पायंडा मोठीजुई गावाने क्रिकेटमध्ये पाडला आहे. त्यामुळे येत्या काळात ग्रामीण भागातील क्रिकेट स्पर्धांची चुरस आणखी वाढेल आणि रंगतही वाढेल,' असे मत रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष आणि आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांनी बुधवारी (ता. २४) मोठीजुई गावच्या प्रीमियर लीगप्रसंगी व्यक्त केले. त्यांच्या हस्ते यावेळी टेनिस स्पर्धांचे उद्घाटन झाले.

मोठीजुई गावातील तरुणांनी आणि ग्रामस्थांनी आता हक्काच्या मैदानासाठी कंबर कसली पाहिजे, मी त्यांच्या मागे ठामपणे उभा आहे. मैदाने वाचविण्यासाठी गुरुचरण वा इतर जमीन असो, परंतु अडवा आणि मैदानाला प्राधान्य द्या, असेही महेंद्रशेठ घरत यांनी आश्वासित केले. यावेळी उरण तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विनोद म्हात्रे आणि काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी आयोजकांनी महेंद्रशेठ घरत यांचे शाल, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित केले. यावेळी माजी सरपंच दीपक भोईर, मोठीजुई गावचे काँग्रेस अध्यक्ष रमेश पाटील, युवा कार्यकर्ते अमेय पितळे, अमोल पाटील आदी उपस्थित होते. यावेळी स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन आणि सूत्रसंचालन नितेश पंडित यांनी केले.



## 'डॉ. देवीदास क. बामणे 'संघर्ष' लिखित उपन्यासकार विवेकी राय पुस्तकाचे प्रकाशन'

**दै.रायगड नगरी । पेण**

भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पेण येथे आज 'मैत्रेय-२०२५' या वार्षिक गॅदरिंग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्रात डॉ. देवीदास क. बामणे 'संघर्ष' लिखित उपन्यासकार विवेकी राय या पुस्तकाचे प्रकाशन पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने यांच्या हस्ते संपन्न झाले.

या प्रसंगी प्रसिद्ध दूरदर्शन मालिकेतील 'नवरी मिळे हिटलरला' या सिरियलमध्ये रेवतीची भूमिका साकार करणाऱ्या श्रीमती आलापिणि निसळ प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

संस्थेचे कार्याध्यक्ष श्री प्रशांत ओक, मानद सचिव श्री सुधीर उर्फ बाळासाहेब जोशी, श्री समीर साने, श्री वसंतराव आठवले, श्री घ. वि. देव, प्राचार्य डॉ. एस. बी. धारप, पत्रकार मित्र, पालकवर्ग तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पुस्तक प्रामुख्याने ग्रामीण जीवनावर आधारित आहे. यात डॉ. विवेकी राय यांच्या बबूल, पुरुष पुराण, लोकऋण, श्वेतपत्र, सोनामाटी, समर शेष है, मंगल भवन, अमंगलहारी, नमामी ग्राम्य आणि देहरी के पार या दहा उत्कृष्ट कादंबऱ्यांचा सखोल अभ्यास करून त्यांचे सविस्तर विश्लेषण करण्यात आले आहे. या सर्व कादंबऱ्यांमधून ग्रामीण समाजातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक व धार्मिक परिस्थितीचे वास्तव चित्रण आढळते. ग्रामीण भागातील गरीब व श्रमिक समाजाचे दुःख, बोलीभाषा, जीवनशैली, खानपान, विवाहसंस्कार इत्यादी पैलूंचे अतिशय बारकाईने वर्णन विवेकी राय यांनी आपल्या साहित्यात केले आहे. त्यांनी



सदैव शोषित आणि वंचित घटकांच्या बाजूने लेखन केले असून शोषक वर्गावर प्रखर प्रहार केला आहे. विवेकी राय यांनी आजवर एकूण ७५ पुस्तके लिहिली असून, भोजपुरी भाषेतही १० ते १२ पुस्तकांचे लेखन केले आहे. त्यांच्या सर्व साहित्यामध्ये भारतीय ग्रामीण समाजाचे दर्शन घडते. डॉ. बामणे यांनी हे पुस्तक लिहिताना अनेक अडचणींचा सामना केला, परंतु संघर्षातून त्यांनी हे लेखन यशस्वीरित्या पूर्ण केले. हे पुस्तक एकूण ३२० पानांचे असून, त्यास अधिकृत खड्डछ क्रमांक प्राप्त झाला आहे.

या प्रकाशनप्रसंगी संस्थेचे कुटुंबप्रमुख व माजी अध्यक्ष ॲड. बापूसाहेब नेने, सध्याचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने, मानद सचिव श्री बाळासाहेब जोशी, कार्याध्यक्ष श्री प्रशांत ओक, उपाध्यक्ष व खजिनदार श्री संजय कडू, तसेच इतर पदाधिकारी, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि डॉ. बामणे यांच्या कुटुंबीयांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## नाताळ सणाच्या पार्श्वभूमीवर मुरुड काशिद समुद्रकिनारी पर्यटकांची रिघ

**दै.रायगड नगरी । मुरुड**

नाताळ सणाच्या निमित्ताने आज गुरुवारी सुट्टी आल्याने मोठ्या प्रमाणात मुरुड जंजिरा किल्ला पाहण्यासाठी पर्यटकांची मांदियाळी येत आहे. त्यामुळे मुरुड तालुक्यातील काशीद व मुरुड बीच हाऊसफुल्ल झाले आहेत. ठिक ठिकाणी वाहतूक कोंडी होत आहे. मुरुड तालुक्यातील सर्व लॉज व हॉटेल हाऊसफुल्ल झाले आहेत.



या वर्षाअखेर २५ डिसेंबर नाताळ सणाची मिळणारी ही सर्वात मोठी सुट्टी असल्याने मोठ्या प्रमाणात पर्यटक फिरण्यासाठी येत आहेत. जगप्रसिद्ध मुरुड जंजिरा व काशीद बीच हे पर्यटकांचे मोठे आकर्षण आहे. मुरुड म्हणजे मीनी गोवा म्हणून संबोधले जाते. या ठिकाणी मुंबई पुणे येथील पर्यटकांना एकदिवसीय सहल आयोजित करता येते त्यामुळे खूप सोईस्कर ठरते. वर्षाअखेर सुट्टी साठी पर्यटक दोन ते तीन महिने आधीच रुम बुकिंग करून ठेवली असल्याचे लॉज मालकांनी सांगितले. त्यामुळे आयत्यावेळी येणाऱ्या पर्यटकांना रुम मिळत नसल्याने गाडीतच किंवा पार्कींग मध्ये रात्र काढावी लागत आहे.

## चिंचपाडा येथे भूमिपुत्रांनी काळ्या फिती लावून सरकारचा केला निषेध

**दै.रायगड नगरी । पनवेल/उरण**

सरकार सत्तापिपासू झाले आहे. सत्ताधारी फोडाफोडीच्या राजकारणात दंग झालेत. त्यांना सत्तेची नशा चढलीय. १९३० च्या जंगल सत्याग्रहाचा इतिहास उरणला आहे. १९८४ च्या लढ्याचे प्रणेते दि. बा. पाटील साहेब आहेत. त्या ऐतिसाहिक आंदोलनात पाच हुतात्मे झालेत. साडेबारा टक्केचा कायदा देशभर लागू झाला तो दिबांमुळेच, ओबीसी-मंडल आयोग लढ्याचे ते शिलेदार आहेत. तरीही आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिबांचे नाव दिले जात नाही. त्यांच्या नावाबाबत जो सरकारचा बोलघेवडेपणा सुरू आहे, त्याबाबत सरकारचा तीव्र निषेध करण्यात आला.

येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भूमिपुत्रांनी सत्ताधाऱ्यांना पहिला झटका द्यायला हवा. विमानतळाचे उदघाटन झाले, आजही विमानही उडाले, तरीही सरकार झोपेचे सोंग घेऊन आहे, याची जाण आता भूमिपुत्र प्रकल्पग्रस्तांना झाली आहे. भूमिपुत्रांच्या छाताडावर वसलेल्या विमानतळाला दिबांच्या नावाची सरकारला कशामुळे येलर्जी आहे. तीन वेळा आश्वासन देऊनही भूमिपुत्रांची सरकार चक्क फसवणूक करीत आहे. त्यामुळे बीजेपी सरकारला दणका देणे गरजेचे आहे. जोपर्यंत दिबांचे विमानतळाला नाव दिले जात नाही तोपर्यंत तरी दिबांचे पुत्र अतुल पाटील यांनी भाजपला लाथ मारायला हवी होती, पण ते त्यांना जमले नाही.

सरकारने एकप्रकारे भूमिपुत्रांचा आता केसाने गळा कापला आहे, पण सर्वसामान्य जनता कोणत्याही क्षणी पेटून उठेल आणि सरकारला नेस्तनाबूत करेल, हे सरकारने लक्षात घ्यावे. त्यामुळे तातडीने दिबांचे नाव विमानतळाला द्या, असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत म्हटले आहे. दिबांचे नाव विमानतळाला न दिल्याने चिंचपाडा येथे भूमिपुत्रांनी आज काळ्या फिती लावून सरकारचा निषेध केला, त्यावेळी महेंद्र घरत बोलत होते. यावेळी माजी आमदार बाळाराम पाटील, निलेश पाटील, राजेंद्र पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांनी सरकारचा तीव्र शब्दांत निषेध केला.

